(10) 2021-22 - mes

January 2022 ISBN 978-93-93079-05-3

Smt. Sindhutai Jadhav Maha Mehkar 330

# ASIAN JOURNAL OF MULTI DISCIPLINARY RESEARCH STUDIES

*Peer Reviewed Multilingual Research Journal*

आजादी के 75 वर्ष

आजादी का अमृत महोत्सव
*Azadi Ka Amrit Mahotsav*

Chief Editor

Dr. Lahorkar Balaji Rangnathrao

# Table of Contents


| Sr. No. | Title of the Article | Name of the Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | 'दिनांक २२ मार्च – जागतिक जल दिन' आपल्याला गंभीर परिणामांची जाणीव आहे काय? | प्राचार्य, डॉ बालाजी रंगनाथराव लाहोरकर श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय मेहकर, जिल्हा बुलडाणा. | 01 |
| 2 | कसे अभ्यासावे विज्ञान? | डॉ. शेख एम. डब्ल्यू. एच. मुख्याध्याक जि. प. हायस्कूल अर्धापूर जि. नांदेड. | 05 |
| 3 | **E-Learning as a Solution for Teaching English Language** | Prof. Dr. B.W.Somatkar HoD, Dept. of English Smt. Sindhutai Jadhao Arts and Sci. College Mehkar. Dist- Buldana. | 07 |
| 4 | सावित्रीबाई फुले यांच्या प्रमाणेच समाज सुधारणा घडवून आणण्यासाठी लढणारी दुर्दम्य इच्छाशक्ती असणारी मुस्लिम स्त्री म्हणजे फातिमा शेख. | डॉ जयश्री लक्ष्मणराव भोसीकर, सहाय्यक प्राध्यापक, सहयोग सेवाभावी संस्थेचे अध्यापक महाविद्यालय, विष्णूपुरी, नांदेड. | 11 |
| 5 | आदिवासी विकासातील अडथळे | प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 14 |
| 6 | आदिवासी विकासाचे दृष्टीकोन | प्रा.अभय जायभाये एन.एस.एस.संचालक शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर | 19 |
| 7 | आदिवासींच्या विकासाबाबत घटनात्मक तरतूदी | प्रा.डॉ. आर.जी.सुरळकर श्रीमती सिंधुताई जाधव कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर | 23 |

निष्कर्ष:

- फातिमा शेख या भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका मानल्या जातात.
- त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मुस्लिम आणि दलित मुलींच्या शिक्षणासाठी वेचले.
- 1848 मध्ये फातिमा शेख यांनी ज्योतिराव आणि सावित्रीबाई फुले यांच्यासोबत मुलींची शाळा काढली.

समारोप:

फातिमा शेख सारख्या स्त्रिया आपल्या समाजासाठी आणि आपल्या समाजातील महिलांसाठी एक आदर्श आहेत, ज्यातून आपल्या समाजातील महिलांनी शिकले पाहिजे आणि निर्भयपणे आणि निःस्वार्थपणे समाजाच्या उभारणीत आणि उन्नतीसाठी आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली पाहिजे. फातिमा शेख यांच्या धैर्याला आणि समाजसेवेला सलाम.

## संदर्भ:

1. https://indianexpress.com/article/trending/trending-in-india/google-pays-tribute-to-fatima-sheikh-7714098/
2. https://www.news18.com/news/lifestyle/google-doodle-pays-tribute-to-fatima-sheikh-indias-first-muslim-woman-teacher-on-her-191st-birth-anniversary-4637009.html
3. https://www.news9live.com/knowledge/fatima-sheikh-birth-anniversary-all-you-need-to-know-about-indias-first-female-muslim-teacher-145719

**05**

# आदिवासी विकासातील अडथळे

प्रा.डॉ.मेघराज रा.शिंदे
श्रीमती सिंधुताई जाधव
कला व विज्ञान महाविद्यालय, मेहकर
मो.9890193315
meghraj.shinde1234@gmail.com

भारतीय घटनेत आदिवासींच्या विकासाबाबत अनेक तरतुदी केलेल्या आहेत. पंचवार्षिक योजनेच्या आधारे आदिवासी विकासाबाबत धोरणात्मक कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर अनुसूचित जमाती आयोग, स्वायत्त अनुसूचित जिल्हे इतर अनेक उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासीचा विकास करण्याचे प्रयत्न करण्यात आले आदिवासीच्या विकासाबाबत अनेक योजना राबविल्या तरीदेखील आदिवासींचा विकास झालेला नाही. ही वास्तविकता आहे. आदिवासी विकास का होऊ शकला नाही. याचा शोध घेणे गरजेचे आहे. आदिवासीचा विकास करण्यासाठी प्रत्येक पंचवार्षिक योजनेमध्ये विशेष निधीचा बापर केला आहे तरी आदिवासीचा विकास होऊ शकला नाही. त्यांचा विकास न होण्याला अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यांच्या विकासामध्ये अनेक अडथळे आहेत. अनेक समस्या आहेत. त्या समस्यमुळे आदिवासीचा विकास होऊ

शकला नाही. आदिवासी लोक विकासाकडे नकारात्मकतेने बघतात. ते बाह्य लोकांकडून कोणतीही मदत घेत नाहीत. कोणत्याही सहकार्याची अपेक्षा ठेवत नाहीत. म्हणून त्यांची समस्या कमी न होता वाढत जाते. अदिवासीच्या समस्या विकासामध्ये अडवळा ठरत आहेत. त्यांचे आरोग्य पोषण जीवनावश्यक गरजा आर्थिक स्वावलंबन या समस्या दूर झाल्या नाहीत. परिणामी आदिवासींचा विकास झाला नाही. आदिवासीच्या विकासामध्ये अनेक अडथळे किंवा समस्या आहेत. त्याचे विश्लेषण खालीलप्रमाणे केले आहे.

**१) उच्च शिक्षणाचा अभाव (Lack of Higher Education) :-** विकास करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी माध्यम आहे. शिक्षणामुळे व्यक्तीच्या सुप्त गुणांचा विकास होतो. सारासार विचार करण्याची क्षमता वाढते. नव्याने निर्माण होणाऱ्या संधीची जाणीव व्यक्तीला शिक्षणामुळे होते. शिक्षीत व्यक्तीला आपल्या समस्या सोडविता येतात. या पद्धतीने शिक्षण प्रत्येक व्यक्तीसाठी महत्त्वाचे असते. शिक्षण हे विकासाचे मार्गदर्शक केंद्र आहे. शिकलेला समाज विकसीत होऊ शकतो. व्यक्तीची जडणघडण शिक्षणामुळे होत असते. आदिवासीमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. त्यामध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. आदिवासी शाळेमध्ये मुलांच्या गळतीचे प्रमाण जास्त असते. आदिवासीमधील बहुतांश मुले दहावी नंतरचे शिक्षण घेत नाहीत. सध्या देशामध्ये ३७.३० टक्के आदिवासींना लिहीता वाचता येत नाही. ६२.७० टक्के आदिवासी साक्षर आहेत. ते फक्त साक्षर आहेत. त्यांचे उच्च शिक्षण झालेले नाही. त्यांच्या उच्च शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प आहे. आदिवासीमध्ये निरक्षरता असल्यामुळे ते साध्या पद्धतीने जीवन जगतात. त्यांना प्रगती, विकास याबाबत कोणत्याही प्रकारचे ज्ञान नाही. ते प्रगती, विकास साधण्यासाठी कोणताही प्रयत्न करीत नाहीत. या कारणामुळे ते विकासापासून वंचित राहीले आहेत.

**२) शेतीविषयक समस्या (Problem of Cultivation) :-** आदिवासीच्या शैक्षणिक समस्येबरोबर त्यांची शेतीविषयक समस्या देखील आहे. आदिवासी लोक फिरती शेती करतात. स्थानांतरीत शेती करतात. अदिवासी स्थिर शेती करीत नाहीत. एका ठिकाणी ४-५ वर्ष शेती केल्यानंतर त्या ठिकाणी शेतीची सुपिकता नष्ट होते असे त्यांना वाटते. म्हणून ते शेतीत बदल करतात. शेतीत बदल करण्यासाठी आदिवासी जंगलतोड करतात. त्याच ठिकाणी त्या लाकडांना जाळतात. त्या लाकडाची राख त्या परिसरामध्ये प्रसरवितात. त्याच ठिकाणी हंगामाच्यावेळी शेती करतात. या शेतीमधून त्यांच्या गरजा पूर्ण होत नाहीत. त्यांना आवश्यक असलेले उत्पादन मिळत नाही. त्यांच्या या पद्धतीमुळे जंगल कटाई होते. उत्तर-पूर्व आणि मध्य भारतातील आदिवासी स्थिर शेती करतात. हे आदिवासी

स्थिर शेती करत असले तरीही त्यांची शेती करण्याची पद्धत पारंपारीक आहे. त्यांच्या शेतीमध्ये नविन बियाणे, खत, यंत्र, सिचन या गोष्टीचा अभाव असतो. त्यांच्या शेतीतून फारसे उत्पन्न मिळत नाही. नव्या पद्धतीने ते आधुनिक शेती करीत नाहीत. त्यांची शेती निसर्गावर अवलंबून असते. आदिवासींना आवश्यक उत्पादन मिळत नसल्यामुळे ते कर्जबाजारी होतात. ते आपल्या प्रदेशामध्ये मोलमजुरी करतात. प्रसंगी ते ठेकेदार व सावकारांना बळी पडतात. ठेकेदार व सावकार लोक त्यांना काही प्रमाणात मदत करून त्यांच्या जमिनी बळकावतात. असे आदिवासीचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना लक्षात आले आहे.

**३) कर्जबाजारीपणा (Indebtedness) :-** आदिवासींची अर्थव्यवस्था साध्या स्वरूपाची आहे. आदिवासी लोक वस्तूविनीमय पद्धतीचा वापर करतात. वस्तुच्या मोबदल्यात वस्तुची देवाणघेवाण करतात. नव्या समाजव्यवस्थेतील लोकांचा प्रभाव आदिवासींच्या जीवनावर पडला आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात पैशाची अर्थव्यवस्था आली आहे. त्यांची वस्तुविनीमयाची पद्धत नष्ट होऊन पैशाची अर्थव्यवस्था आदिवासीमध्ये निर्माण झाली आहे. समाजापासून दूर जाणाऱ्या आदिवासीना कोणत्याही प्रकारचे व्यवहार ज्ञान नसल्यामुळे त्यांच्या स्वभावाचा फायदा व्यापारी, सावकार, ठेकेदार यांनी घेतला त्यांचे शोषण केले. त्यांना थोड्याफार प्रमाणात मदत करून त्यांच्या जमिनी या लोकांनी बळकावल्या. आदिवासींचे उत्पन्न कमी असल्यामुळे ते आपल्या जमिनी परत घेऊ शकले नाही. जास्त व्याजदरामुळे आदिवासीचे जीवन कनिष्ठ प्रतीचे झाले आदिवासी कर्जबाजारी झाले. त्यांचा कोणत्याही प्रकारचा विकास झाला नाही. उलट सभ्य समाजामुळे त्यांचे दारिद्रय वाढत चालले आहे.

**४) दारिद्रयाची समस्या (Problem of Poverty) :-** आदिवासी लोक दुर्गम भागात राहतात. दऱ्याखान्यात वास्तव्य करतात. त्यांचे जीवन वनावर, शेतीवर आधारित आहे. ते कोणताही व्यवसाय करीत नाहीत. त्यांना शेतीमधून वनौषधीमधून फारसे उत्पन्न मिळत नाही. त्यामुळे आदिवासींची आर्थिक परिस्थिती दयनिय झाली आहे. ते कसेतरी आपले जीवन जगतात. दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या आदिवासींची संख्या बरीच आहे. त्यांच्या दारिद्रयाचा फायदा जमिनदार, सावकार, ठेकेदार, वन अधिकारी घेतात. त्यामुळे आदिवासीच्या जीवनात कोणताही बदल झाला नाही. त्यांना विकासाची कोणतीही आकांक्षा निर्माण झाली नाही.दारिद्रयामुळे त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन नकारात्मक झाला आहे. आदिवासीची दारिद्रयाची समस्या विकासामध्ये अडथळा ठरली आहे.

**५) नेतृत्त्वाचा अभाव (Lack of Leadership) :-** आदिवासीचा विकास होऊ-

शकला नाही. याचे मुख्य कारण त्यांच्यामध्ये नेतृत्वाचा अभाव आहे. आदिवासींना लोकसभा, विधानसभा, पंचायतराजमध्ये आरक्षण मिळाले आहे. त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात योग्य प्रतिनिधीत्व दिले आहे. त्यांच्यात काही प्रमाणात राजकीय नेतृत्व निर्माण झाले आहे. हे राजकीय नेते वेगवेगळया पक्षात विभागले आहे. ते आपल्या समुदायाची भूमिका मांडत नाहीत. आपल्या प्रदेशातील प्रश्न मांडत नाहीत. निवडून आल्यानंतर आपल्या प्रदेशातील लोकांना भेटत नाहीत. त्यांच्यामध्ये मिसळत नाहीत. त्यामुळे आदिवासींना स्वातंत्र्यानंतर योग्य नेतृत्व मिळाले नाही. म्हणून आदिवासी समाज आहे त्या अवस्थेत राहीला. अनेक लोकांनी आदिवासीच्या प्रश्नावर सत्ता मिळवीली, मंत्री झाले, योजनांची लूट झाली. काही मुठभर लोकांचे जीवन बदलले, आदिवासीमध्ये फारसा बदल झाला नाही. याचे मुख्य कारण नेतृत्वाचा अभाव येत आहे.

**६) विकास कार्यक्रमाची अयोग्य अंमलबजावणी (Improper Implementation of Development Programme) :-** आदिवासी विकासासाठी अनेक योजना राबविल्या. यासंबंधीची तरतूद सज्यघटनेत केली आहे. या योजना चांगल्या आहेत. असे असले तरीही या योजनेची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली नाही. या योजना राबवित असताना प्रशासन व्यवस्था अपुरी असल्यामुळे तसेच या प्रशासनाला योजना राबवित असताना उदासिनता असल्यामुळे आदिवासीच्या विकास कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी झाली नाही. विकास कार्यक्रमाच्या नोंदी झाल्या. विकास कार्यक्रमाच्या योजना राबविल्या गेल्या. ज्यांच्यासाठी विकास योजना होत्या त्यांना या योजनेचा लाभ मिळाला नाही. म्हणून अनेक विकास कार्यक्रम योजना राबविल्या असतांना आदिवासीचा विकास होऊ शकला नाही.

**७) अपुऱ्या बँकिंग सेवा (Inadequate Banking Services) :** आदिवासींचा विकास होऊ शकला नाही, याला शिक्षणाचा अभाव, शेती करण्याची पद्धत, कर्जबाजारीपणा, दारिद्रय, नेतृत्वाचा अभाव, विकास कार्यक्रमाची अयोग्य अंमलबजावणी इ. कारणे जबाबदार आहेत. त्याचबरोबर आदिवासी क्षेत्रामध्ये पुरेशा बँकिंग सुविधा उपलब्ध नसल्यामुळे आदिवासींचा विकास होऊ शकला नाही आदिवासी लोक दऱ्याखोऱ्यात वास्तव्य करतात दुर्गम भागात राहतात. त्या ठिकाणी बँकेचा अभाव आढळून येतो. ज्या ठिकाणी बँका आहेत. तेथील बँक अधिकारी आदिवासी पर्यंत जात नाही आदिवासी क्षेत्रामध्ये बँक नसल्यामुळे आदिवासी लोक बँकेकडून कर्ज घेऊ शकत नाही. त्यांना नाममात्र दरामध्ये कर्ज उपलब्ध होत नाही. पर्यायाने आदिवासी सावकार ठेकेदाराकडे जातात. त्यांच्याकडून कर्ज घेतात. त्यांना व्याजदर जास्त लावला जातो. त्यांचे जीवन दारिद्रयात जाते.

**८) पोषक आहाराची समस्या (Problem of Nutrition) :-** आदिवासी लोक साध्या पद्धतीने जीवन जगतात. त्यांचे उत्पन्न अत्यल्प आहे. ते आवश्यक असलेला पोषक आहार मिळवू शकत नाही, त्यांना सकस आहार मिळत नाही. त्यांना स्वच्छ पाणी मिळत नाही आदिवासीमध्ये आजारी लोकांची संख्या जास्त असते. ही समस्या कुपोषणामुळे निर्माण झाली आहे. आदिवासीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचल्या नाही. त्यांना दवाखान्याची सुविधा उपलब्ध नाही. ते दवाखान्यातून इलाज करून घेत नाहीत. ते धर्म व जादूवर विश्वास ठेवतात. ते भोंदूबाबाकडे जातात. घरातील काम करणारा व्यक्ती आजारी पडल्यामुळे त्यांच्या एकूण कुटूंबाची समस्या निर्माण होते. आदिवासी लोक विकास करण्याचे स्वप्न पाहत नाहीत. ते जीवन जगण्याचा प्रयत्न करतात.

**९) विकास कार्यक्रमाचे अपयश (Failure of Development Programme) :-** आदिवासीचा विकास व्हावा म्हणून पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून अनेक प्रयत्न करण्यात आले. हे प्रयत्न करीत असताना योजना राबविल्या जात असताना आदिवासीचा अभ्यास केला गेला नाही. आदिवासी लोकांना विश्वासात घेतले गेले नाही. आदिवासीच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संशोधक, समाजकार्यकर्ते यांचा सल्ला घेतला नाही. त्यांच्या अभ्यासातील मुद्दे लक्षात घेऊन योजना राबविल्या नाहित. त्यामुळे फक्त योजना राबविल्या गेल्या. योजनेवरील खर्च करण्यात आला. या योजनेचा फायदा नोकरशाही, प्रशासकीय अधिकारी, आदिवासी मधील काही लोकांनी घेतला. बहुसंख्य आदिवासींना आपल्यासाठी काही योजना आहेत त्या राबविल्या जात आहेत. याची जाणिव देखील नाही. ते विकासापासून वंचित राहिले. या कारणामुळे आदिवासीचा विकास होऊ शकला नाही. आदिवासी विकासासाठी घटनेत अनेक तरतुदी आहेत. यासाठी राष्ट्रीय धोरण तयार करण्यात आले. असे असले तरीही आदिवासी विकासापासून दूर आहेत. त्यांना विकासाची कोणतीही बाजू माहिती नाही. कारण या योजनेची योग्य अंमलबजावणी झाली नाही. यासाठी कोणतेही उपक्रम राबविले नाही. अनेक योजनेमधील पूर्ण निधी खर्च केला गेला नाही. योजना पारदर्शक राबविल्या गेल्या. नाही याला कारण राजकीय इच्छाशक्ती आहे. उदासिन नेतृत्यामुळे या योजना फसल्या आहेत. आदिवासी विकास योजना केवळ कागदावरच राबविल्या गेल्या ही वस्तुस्थिती आहे.

**संदर्भ ग्रंथ सुची :**


1) डॉ.प्रदिप आगलावे – सामाजिक मानवशास्त्र, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
2) डॉ.ए.डी.चव्हाण, रा.ज.लोटे - सामाजिक मानवशास्त्र, पिंपळापुरे प्रकाशन, नागपूर.
3) डॉ.बी.के.किर्दक, डॉ.दया.पांडे -

सामाजिक मानवशास्त्र, अथर्व प्रकाशन, जळगांव.

4) डॉ.दिनकर उंबरकर - सामाजिक मानवशास्त्र, साधना प्रकाशन, परभणी.
5) Deogaonkar S.G. 1982
6) Vidyarthi, Shay & Dutta 1980 Govt. in India.

Coordinator - IQAC
Smt.Sindhutai Jadhao College
Mehkar,Dist.Buldana

06

# आदिवासी विकासाचे दृष्टीकोन

प्रा.अभय जायभाये
एन.एस.एस.संचालक
शिवाजी विद्यापिठ, कोल्हापुर मो.7249490004
jaibhaye.abhay@gmail.com

आदिवासी विकासाचे तीन दृष्टीकोन आहेत. आदिवासी समस्या दूर करण्यासाठी हे तीन दृष्टीकोन महत्वाचे आहेत. असे अभ्यासकांनी म्हटले आहे. विकासाचे दृष्टीकोन खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) पृथकता (Isolation) :** आदिवासींच्या अनेक समस्या गैर आदिवासी लोकांमुळे, बाह्य घटकामुळे निर्माण झाल्या आहेत. आदिवासीच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना बाहय घटकापासून पृथक केले पाहिजे. त्यांना सभ्य समाजापासून दूर ठेवले पाहिजे, असा विचार मांडला गेला. या विचाराचे समर्थन डॉ. इल्विन यांनी केले परंतु नंतर त्यांच्या लक्षात आले की, सभ्य समाजामुळे आदिवासीच्या जीवनावर परिणाम झाला आहे. व्यापारी, सावकार, अधिकारी लोकांनी आदिवासीचे शोषण केले आहे. आदिवासींना पृथक ठेवले पाहिजे असे विचार त्यांनी १९४२ मध्ये प्रकाशीत झालेल्या आपल्या Loss of Nere या ग्रंथात केले आहे. आदिवासी करीता वेगळा विभाग करण्यात यावा, त्यामध्ये कुणीही हस्तक्षेप करू नये, असे डॉ. इल्विन यांनी म्हटले